भातसा पाटबंधारे प्रकल्प, ता. शहापूर, जि. ठाणे या प्रकल्पास रुपये रु. १५५०.०० कोटी इतक्या किंमतीस सहावी सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत..

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक: भातसा सुप्रमा ०६१९/प्र.क्र.२४२/२०१९/मोप्र-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- ११ सप्टेंबर, २०१९

पहावे :-

१) शासन निर्णय क्रमांक बीडब्ल्युएस/१०६७/डब्ल्यु/युडीपीएच विभाग, दि.२८/०६/१९६७

२) शासन निर्णय नगरविकास, सार्वजनिक आरोग्य आणि गृहनिर्माण विभाग क्र.आय आणि पी डब्ल्यु/एटी/६१७१-१०८४ एस, दि.२२/०३/१९७२

३) शासन निर्णय, पाटबंधारे विभाग क्रमांक बीटीएस/१०८७/३५(३१-९८) एमएजे - ३, दि. ०६/०६/१९८१

४) शासन निर्णय, पाटबंधारे विभाग क्रमांक बीटीएस/१०९६/सा ३०५६ (१९६५) एमएजे - ५, दि. ०१ डिसेंबर १९८३

५) शासन निर्णय, पाटबंधारे विभाग, भातसा § १०९६/सा - २०३३ /(५८२/९६) मोप्र-१, दि. २९ जुन २००२

६) शासन निर्णय, जलसंपदा विभाग, भातसा/सुप्रमा/३०७/(१०७/२००७)/ मोप्र-१, दि. १२/१०/२००७

प्रस्तावना :

मुंबई महानगरपालिकेची पाण्याची गरज विचारात घेता पाणी पुरवठा करण्यासाठी सन-१९६१ मध्ये उच्चाधिकार समिती स्थापन करण्यात आली. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने (नागरी विकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग) दि.१७/०४/१९६४ अन्वये भातसा प्रकल्प योजना निश्चित केली.

भातसा मोठा प्रकल्प हा भातसा व चोरणा नदीच्या संगमावर साजिवली गावाजवळ ता. शहापूर येथे प्रस्तावित करण्यात आला. भातसा प्रकल्पाच्या मुळ प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकाप्रमाणे मुंबई महानगरपालिकेस १४२.६४ दलघमी पाणी देण्याचे प्रस्तावित होते.

त्यानंतर उपलब्ध पाण्यानुसार -मुंबई महानगरपालिकेस ४२७.९३ दलघमी पाणीपुरवठा करणे, सिंचन क्षेत्र ५९०० हेक्टर ऐवजी २३००० हेक्टर करणे तसेच मुंबई महानगर पालिकेस पाणी पुरवठा करतांना १५ मेगावॅट वीज निर्मिती करणे॰, असे प्रस्तावित करण्यात आले होते. २३,००० हेक्टर सिंचन क्षेत्रापैकी ६३२० हे. सिंचन क्षेत्र डाव्या कालव्यावर प्रस्तावित होते. त्यासाठी भातसा धरणापासून ६ कि.मी. अंतरावर मुमरी धरण प्रस्तावित करून अतिरिक्त ७२.४० दलघमी पाणीसाठा करण्यासाठी मुमरी धरणाचा भातसा प्रकल्पाच्या तिस-या सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकात समावेश करण्यात आला.

भातसा प्रकल्पांतर्गत -भातसा नदीवर भातसा धरण बांधणे, मुमरी नदीवर मौजे सारंगपूरी, ता. शहापूर, जि. ठाणे येथे मुमरी धरण बांधणे, भातसा उजवा कालवा व डावा कालवा बांधणे आणि १५ मे. वॅट वीज निर्मितीसाठी विद्युत गृह बांधणे॰ इत्यादी बाबी अंतर्भूत होत्या.

दरम्यान एकात्मिक राज्य जल आराखड्यानुसार प्रकल्पाचा पाणीवापर ७१६.१२ द.ल.घ.मी. इतका असून बिगर सिंचन पाणी आरक्षण ७५५.४८ द.ल.घ.मी. इतके आहे. मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक यांचे कडून पाण्याची उपलब्धता प्रमाणित करून या उपलब्धतेतून बिगर सिंचन आरक्षण वजा जाता पाणी उपलब्ध होत असल्याची खातरजमा करून शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज कालव्याची कामे करू नयेत. तसेच डावा कालवा किमी १७ च्या पुढे व उजवा कालवा किमी ५४ च्या पुढे रद्द करण्याबाबत कार्यवाही करावी असे प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यामुळे प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र २३,००० हे. ऐवजी ९१९० हे. इतके होत आहे.

भातसा पाटबंधारे प्रकल्पास उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयानुसार रु.१३.६८ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यानंतर संदर्भ क्र. २, ३, ४, ५, ६ अन्वये अनुक्रमे दिनांक २२/०३/१९७२, दि. ०६/०६/१९८१, दि.०१/१२/१९८३, दि. २९/०६/२००२, दि. १२/१०/२००७ च्या शासन निर्णयाव्दारे अनुक्रमे रु.१६.३३ कोटी, रु २८.५९ कोटी, रु ७९.६६ कोटी, रु ३५८.२४ कोटी व रु ७६८.१० कोटी या किंमतीस प्रथम, व्दितीय, तृतीय, चतुर्थ व पाचवी सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

भातसा पाटबंधारे प्रकल्पाचे दि.१२/१०/२००७ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे मान्यता प्रदान केलेले पाचवे सुधारित प्रशासकीय अंदाजपत्रक सन २००३-०४ च्या ददरसूचीवर आधारीत होते. त्यानंतरच्या कालावधीत प्रकल्पाची कामे वेगाने प्रगतीपथावर होती. त्यामुळे दरसूचीतील दरात झालेल्या वाढीमुळे कामाच्या खर्चात बरीच वाढ झाली. त्यानंतर प्रकल्पाच्या खर्चात झालेली वाढ लक्षात घेऊन प्रकल्पाचे सहावे सुधारित अंदाजपत्रक सन २०१७-१८ च्या दरसूचीवर आधारित तयार करून कोकण पाटबंधारे विकास महामंडळाने सहावी सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव शासनास मान्यतेस्तव सादर केला आहे. खर्चातील वाढ ही प्रामुख्याने दरसूचीतील वाढ, भूसंपादनाच्या किंमतीत झालेली वाढ यामुळे झालेली आहे.

प्रकल्प अहवालावर दि. ०९/०९/२०१९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सविस्तर चर्चा झाली आहे. त्या अनुषंगाने भातसा पाटबंधारे प्रकल्पाचे उर्वरित काम पूर्णत्वास नेण्याच्या उद्देशाने, जलसंपदा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांची सन २०१७-१८ च्या दरसूचीवर आधारित रुपये १५५०.०० कोटी इतक्या किंमतीच्या सहावी सुधारित प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय -

ठाणे जिल्ह्यातील भातसा पाटबंधारे प्रकल्प या प्रकल्पाच्या जलसंपदा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांची सन २०१७-१८ च्या दरसूचीवर आधारित रुपये १५५०.०० कोटी (रुपये एक हजार पाचशे पन्नास कोटी फक्त) [प्रत्यक्ष कामासाठी रुपये १२६१.१८ कोटी (रुपये एक हजार दोनशे एकसष्ठ कोटी अठरा लक्ष) व अनुषंगीक खर्च रुपये २८८.८२ कोटी (रुपये दोनशे अठ्याऐंशी कोटी ब्याऐंशी लक्ष)] इतक्या किंमतीस खालील अटींच्या अधीन राहून सहावी सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) राज्यस्तरिय तांत्रिक सल्लागार समितीच्या अहवालातील मुद्यांची पुर्तता करावी.

२) सिंचन विषयक विशेष चौकशी समितीने प्रकल्पाबाबत उपस्थित केलेल्या मुद्यांची प्राधान्याने पूर्तता करावी.

३) मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक यांचे कडून पाण्याची उपलब्धता प्रमाणित करून घ्यावी.

४) वरील (३) नुसार उपलब्धतेतून बिगर सिंचन आरक्षण वजा जाता पाणी उपलब्ध होत असल्याची खातरजमा करून आणि शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज कालव्याची कामे करू नयेत. डावा कालवा किमी १७ च्या पुढे व उजवा कालवा किमी ५४ च्या पुढे रद्द करण्याबाबत कार्यवाही करावी.

५) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय प्रकल्पात समावेश करू नये.

६) प्रकल्पाचे काम नियोजनानुसार व सुधारित प्रशासकीय मान्यता किंमतीच्या मर्यादेत पूर्ण करण्यात यावे.

७) संपूर्ण लाभक्षेत्रामध्ये पाणी वापर संस्था स्थापन करुन सिंचन व्यवस्थापन पाणी वापर संस्थेस हस्तांतरित करावे.

८) सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वितीकरणाच्या विविध टप्प्यांवर क्षेत्रिय अधिका-यांनी घेतलेल्या विविध निर्णयास व क्षेत्रिय अनियमितता झाली असल्यास अशा अनियमिततेस सहमती असल्याचे गृहीत धरता येणार नाही.

प्रकल्पाच्या उपशिर्षनिहाय तरतुदींचा गोषवारा परिशिष्ट “अ” मध्ये सोबत जोडला आहे.

या प्रकल्पाच्या कामावरील खर्च मागणी क्र. आय-५, मुख्य लेखाशीर्ष ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (८०) सर्वसाधारण, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका, (०२) विविध पाटबंधारे विकास महामंडळांना भाग भांडवली अंशदान, (०२) (०३) कोकण पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (संगणक संकेतांक ४७०१ एच-७५४) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व शासनाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.९७/२०१९ का.१४३४, दि.२०/८/२०१९ व वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.२३२/२०१९व्यय-१२, दि.३१/८/२०१९ अन्वये तसेच मा. मंत्रिमंडळाने दि. ०९.०९.२०१९ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९११७४१२९१४२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Tirmanwar Santosh Ramkishan

Digitally signed by Tirmanwar Santosh Ramkishan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cf0117ad341668a72bc3fcc8a83a2fab1d9b23e2ae276141178afc4dc8b5d790, serialNumber=37b5be33c57130083d7c9245fb12e91e0019861744c920676df5a5236c14b3a2, cn=Tirmanwar Santosh Ramkishan
Date: 2019.09.11 18:01:02 +05'30'

सहपत्र : परिशिष्ट “अ”

(सं. रा. तिरमनवार)
शासनाचे उप सचिव

प्रत-

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

३) सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

४) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.

५) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कोकण पाटबंधारे विकास विकास महामंडळ, ठाणे.

परिशिष्ट “अ”

भातसा पाटबंधारे प्रकल्प, ता. शहापूर, जि. ठाणे
या प्रकल्पाचा सहावी सु.प्र.मा. नुसार उपशिर्षनिहाय तरतुदींचा गोषवारा

(रक्कम रु. कोटी मध्ये)

उपशिर्ष	मंजूर पाचवी सुप्रमानुसार तरतूद	प्रस्तावित सहावी सुप्रमा नुसार तरतूद	वाढ / घट	माहे ०३/२०१९ अखेर झालेला खर्च	उर्वरीत कामाची किंमत
शिर्षकामे					
अ - प्राथमिक	३.५३	२.९३	-०.६	२.५९	०.३४
ब - भूसंपादन	४४.१२	४०३.९७	३५९.८५	१८६.८३	२१७.१४
सी - कामे (धरण)	२३६.५	५८६.१५	३४९.६५	२०३.०२	३८३.१३
डी - विमोचक	६.६२	२.४८	-४.१४	२.४८	०
ई - प्रपात	२.१६	०.४५	-१.७१	०.४५	०
एफ -	४०.०३	७.१४	-३२.८९	७.१४	०
जी - पूल	९.४५	१४.५४	५.०९	२.५	१२.०४
एच - एस्केप	१.५४	०.३५	-१.१९	०.३५	०
के - इमारती	१०.०३	८.०९	-१.९४	८.०९	०
एल - मातीकामे	६१.३८	३७.७७	-२३.६१	३७.७७	०
PDN	०	५०.००	५०.	०	५०.००
एम - वृक्षलागवड	८.४६	०.६८	-७.७८	०.६८	०
ओ - संकिर्ण	३८.३९	४०.१२	१.७३	३९.४९	०.६३
पी - देखभाल	३६.८२	३९.८६	३.०४	३५.५१	४.३५
क्यू - हत्यारे व सयंत्रे	३.७१	४.२४	०.५३	४.२४	०
आर - दळणवळण	६.९६	३०.१५	२३.१९	९.३२	२०.८३
यु - वितरिका	३२.६४	१०.४५	-२२.१९	१०.४५	०
व्ही - शेत चारी	१३.३९	०.१४	-१३.२५	०.१४	०
डब्लू - निचराचारी	४.१९	०.०६	-४.१३	०.०६	०
एक्स - पर्यावरण	६७.७	२०.५२	-४७.१८	२०.५	०.०२
वाय - संग्रह तूट	१.४४	१.०९	-०.३५	०	१.०९
अनुषंगिक व इतर	१३९.०३	२८८.८२	१४९.७९	२०१	८७.८२
एकूण	**७६८.१**	**१५५०.००**	**७८१.९१**	**७७२.६१**	**७७७.३९**